**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक १९ मे २०२४**

## ठळक बातम्या

1. **राज्यात उद्या पाचव्या आणि अंतिम टप्प्यासाठी होणार मतदान- मतदारांना आकर्षित करण्यासाठी सजवली जाणार मतदान केन्द्रे.**
2. **आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात ७ ते २४ जुलै दरम्यान विठ्ठल-रुक्मिणीचे २४ तास दर्शन सुरू करण्यात येणार.**
3. **अकोला शहरातील चार विद्युत उपकेंद्रांना मिळाले आयएसओ मानांकन.**

**आणि**

4. **नैऋत्य मौसमी पाऊस भारतीय उपखंडात दाखल.**

*****

पाचवा टप्पा मतदान

उद्या लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातले मतदान होणार आहे. त्यासाठी प्रशासन सज्ज झालं आहे. ६ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या मिळून एकोणपन्नास जागांसाठी उद्या मतदान होईल आणि ६९५ उमेदवारांचं राजकीय भवितव्य मतदान यंत्रात बंद होईल. अनेक महत्त्वाच्या नेत्यांच्या भवितव्याचा फैसला उद्या होणार आहे. यात रायबरेलीतून काँग्रेस नेते राहुल गांधी, लखनऊ मधून राजनाथ सिंग, ओमर अब्दुल्ला, चिराग पासवान, स्मृती इराणी, लालू यादव यांची कन्या रोहिणी आचार्य यांचा समावेश आहे. महाराष्ट्रात पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यात १३ मतदारसंघांमध्ये मतदानाची तयारी पूर्ण झाली आहे. एकूण २६४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत आणि २४ हजार ५७९ केंद्रांवर मतदान होणार आहे. यासाठी ४१ हजार ८९७ बॅलट युनिट्स, २४ हजार ५७९ कंट्रोल युनिट्स आणि व्हीव्हीपॅटची, तसंच मतदान केंद्रांवर नजर ठेवण्यासाठी वेबकास्टिंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

विशेष मतदारसंघ-डेस्क

राज्यात उद्या पाचव्या टप्प्यात मतदान होत आहे. हा महाराष्ट्रातील अंतिम टप्पा असून मतदान सकाळी ७ वाजता सुरू होऊन सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरु राहणार

आहे.याआधीच्या टप्प्यांमध्ये मतदानाची कमी टक्केवारी पाहता मतदानाचं प्रमाण वाढवण्याचे प्रयत्न निवडणूक आयोग करत आहे. मतदान केंद्रांवर पिण्याचं पाणी, वैद्यकीय सोयी, शौचालयं, प्रतीक्षालयं यांची सोय करण्यात आली आहे. पडदे, कार्पेट, फुगे, झालर, रांगोळी, सेल्फी बुथ यांच्या सहाय्याने आणि एकसारख्या रंगांच्या कपड्यांनी महिला, युवा तसंच दिव्यांग मतदान केंद्र सजली जाणार आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी तसंच मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. ठाणे जिल्हयातील भिवंडी लोकसभा मतदारसंघातील भिवंडी ग्रामीण या मतदार संघामधील सारंग गावातील मतदान  केंद्र क्रमांक ३२१ हे असेच एक विशेष  मतदान केंद्र राहणार आहे जे ठाणे जिल्हयातील आगरी-कोळी संस्कृतीनं सजविण्यात येणार आहे. यासाठी मासे पकडण्यासाठी वापरण्यात येणारी जाळी, मासे विक्रीसाठी वापरण्यात येणाऱ्या टोपल्या, बोट, रांगोळी साकारण्यात येणार आहे. त्याचबरोबर मतदान केंद्रावरील कर्मचारी हे पारंपारीक कोळी वेशभूषेमध्ये राहणार आहेत.

सहावा टप्पा

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी आठ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात ८८९ उमेदवार रिंगणात आहेत. ५८ लोकसभा मतदारसंघासाठी या टप्प्यात मतदान होणार आहे. यासाठी १ हजार ९७८ जणांनी नामांकन अर्ज दाखल केले होते. छाननीनंतर यातले ९०० अर्ज वैध ठरले. दरम्यान, जम्मू काश्मिरमधल्या अनंतनाग राजौरी मतदारसंघातलं मतदान या आधी स्थगित केलं गेलं होतं. या मतदारसंघात सहाव्या टप्प्यात मतदान होणार आहे.

निवडणुकीदरम्यान पैशांचा वापर

लोकसभा निवडणुकीदरम्यान पैशांचा वापर आणि मतदारांना प्रलोभनं देण्यासंदर्भात निवडणूक आयोगाने कारवाई सुरु केली आहे. संबंधित यंत्रणांनी आत्तापर्यंत ८ हजार ८८९ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात ३ हजार ९५८ कोटी रुपये किंमतीच्या अंमली पदार्थांचाही समावेश आहे. अशा प्रकारांबाबत सतर्क राहण्याची सूचना निवडणूक आयोगानं मुख्य निवडणूक अधिकारी आणि संबंधित यंत्रणांना दिली आहे.

प्रतापराव भोसले निधन

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचे वयाच्या नव्वदाव्या वर्षी वृद्धापकाळाने भुईंज येथील निवासस्थानी आज पहाटे निधन झाले. भुईंज गावचे सरपंच म्हणून राजकीय कारकिर्दीला प्रारंभ करणाऱ्या प्रतापराव भोसले यांनी ४ वेळा आमदार म्हणून वाई खंडाळा विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करताना कॅबिनेट मंत्री म्हणून यशस्वी काम केलं. त्यानंतर ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांच्या निधनाने रिक्त झालेल्या सातारा लोकसभा मतदार संघातून ३ वेळा संसदेत खासदार म्हणून निवडून गेले. या काळात विविध राष्ट्रीय समित्यांवर महत्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्यानंतर त्यांनी १९९७ साली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारून महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली आघाडीचं सरकार स्थापन केलं. 'पक्षाच्या कठीण काळातही संघटनेचे काम व पक्षाचा विचार रुजवण्याचे काम प्रतापरावांनी केलं. प्रतापराव भोसले यांच्या निधनाने एक सुसंस्कृत निष्ठावान नेता हरपला आहे', अशा शोक भावना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केल्या आहेत.

आषाढी एकादशी सोहळा

१७ जुलै २०२४ रोजी पंढरपुरात आषाढी एकादशी सोहळा होत आहे. यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या यात्रेला भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन ७ ते २४ जुलै दरम्यान विठ्ठल-रुक्मिणी मातेचे २४ तास दर्शन सुरू करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले. दर्शन रांग, पत्रा शेड, दर्शन मंडप इथं भाविकांना अधिकच्या सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. यासाठी २ हजार कर्मचारी, स्वयंसेवकाची नेमणूक करण्यात येणार आहे.यावेळी दर्शनरांग व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, यात्रेतील प्रथा व परंपरा, सुरक्षा व्यवस्था, दर्शन रांगेतील अन्नदान, वैद्यकीय व्यवस्थेचे स्टॉल, स्वच्छता व्यवस्था, शासकीय महापूजा, अपघात विमा पॉलिसी, महिलांसाठी चेंजिंग रूम, हिरकणी कक्ष व विश्रांती कक्ष आदी व्यवस्थेचा आढावा घेऊन आषाढी यात्रेच्या अनुषंगाने करावयाच्या नियोजनाचा आढावा घेऊन भाविकांना अधिकाधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनास केल्याची माहिती शेळके यांनी दिली.

## कर्नल वैभव अनिल काळे

भारतीय सैन्यातून निवृत्ती घेतल्यानंतर कर्नल वैभव अनिल काळे गाझापट्टीत संयुक्त राष्ट्राच्या शांती सेनेच्या सेवेत कार्यरत होते. तिथेच झालेल्या हल्ल्यात ते हुतात्मा झाले. ही घटना संपूर्ण देशासाठी क्लेषकारक आणि दुःखदायक आहे. मात्र कर्नल वैभव काळे यांच्या शौर्यावर समस्त नागपूरकरांना अभिमान असल्याचे गौरवोद्गार अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद विदर्भ प्रांताचे सचिव महेश आंबोकर यांनी काढले. लक्ष्मीनगरातील तोफखाना चौकात काल  कर्नल वैभव काळे यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. यावेळी झालेल्या  सभेत महेश आंबोकर बोलत होते.

## आयएसओ मानांकन

ग्राहकांना गुणवत्तापूर्ण आणि अखंड सेवा देण्यासाठी उपकेंद्रात करण्यात आलेल्या कार्यामुळे विदर्भात प्रथमच चार विद्युत उपकेंद्रांना आयएसओ 9001-2015 मानांकन मिळाले आहे. विशेष म्हणजे ही चारही उपकेंद्रे अकोला शहरातील आहेत. आयएसओ मानांकनासाठी आवश्यक असलेल्या 59 सुधारणा पूर्ण केल्यामुळे अकोला शहरातील 33 के.व्ही. खडकी, 33 के.व्ही पिकेव्ही, 33 के.व्ही कौलखेड आणि 33 के.व्ही सुधीर कॉलनी या चार उपकेंद्रांना  आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे.

## नागार्जुन संग्रहालय ईमारत लोकार्पण

काल दिनांक १८ मे रोजी  आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनाचे औचित्य साधून बौद्ध इतिहास आणि संस्कृती संशोधन संस्था संचालित संग्राहक दिलीप वानखेडे स्मृती नागार्जुन संग्रहालयाच्या नवनिर्मित ईमारतीचा लोकार्पण समारोह आयोजित करण्यात आला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीचे भदंन्त नाग दिपंकर महास्थविर, यांच्या समवेत मोठ्या संख्येत विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## गर्भाशय मुखाचा कर्करोग लस

महत्त्वपूर्ण आणि सक्रिय आरोग्य उपक्रमात, मध्य रेल्वच्या  नागपूर विभागाने 17 मे रोजी वर्धा इथं  आयोजित समर्पित लसीकरण शिबिरात आपल्या महिला कर्मचाऱ्यांना गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या लसींचा दुसरा डोस दिला. पहिला डोस  8 मार्च रोजी देण्यात आला होता.

मान्सून/हवामान

बंगालच्या उपसागराचा काही भाग, निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमानच्या समुद्रात नैऋत्य मौसमी पाऊस दाखल झाला असल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं दिली आहे. भारताच्या दक्षिण भागात येत्या तीन दिवसात मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला आहे. तामिळनाडू आणि केरळ मध्ये येत्या २१ मे पर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. विदर्भातील अमरावती, बुलढाणा, नागपूर आणि अकोला जिल्ह्यात येत्या काही तासांत काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. दिनांक २१ ते २३ मे या तीन दिवसांत संपूर्ण विदर्भात पावसाचा येल्लो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उद्या अमरावती, वर्धा, नागपूर, गोंदिया, आणि भंडारा वगळता उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांत ढगाळ वातावरणासह वादळ आणि हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात अली आहे. दरम्यान मागील २४ तासांत कमाल तापमान अकोला इथं ४२ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं.

--------